तरुण भारत 11 ऑक्टो. 2013

# कमला कॉलेजमध्ये शेअरबाजारविषयक व्याख्यान

कोल्हापूर
कमला कॉलेजच्या अर्थशास्त्र विभागाच्यावतीने सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेडच्या गुंतवणूकदार शिक्षण विभागाचे प्रमुख चंद्रशेखर ठाकूर यांचे 'शेअर बाजार – जागरूकता" या विषयावर महाविद्यालयात व्याख्यान झाले.

प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या व्याख्यानात काही मूलभूत गोष्टी समजावून घेतल्यास सर्वसामान्य व्यक्तीला शेअरबाजारातील व्यवहार करता येणे शक्य असल्याचे मत व्यक्त केले. डी मॅट खाते उघडण्याच्या प्रक्रियेमुळे पूर्वी शेअंर सर्टिफिकेट सांभाळून ठेवावे लागत होते. त्याची आता गरज उरली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



कोल्हापूर : कमला कॉलेजतर्फे आयोजित शेअरबाजारावरील व्याख्यानात बोलताना चंद्रशेखर ठाकूर. सोबत प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रा. डॉ. अनघा पाठक, प्रा. पोवार.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी शेअरबाजारातील व्यवहार समजावून घेऊन योग्य पद्धतीने गुंतवणूक केल्यास ती फायदेशीर होऊ शकते, असे मत नोंदवले.

स्वागत व सूत्रसंचालन प्रा. डॉ. अनघा पाठक यांनी केले. प्रा. डॉ. नेताजी पोवार यांनी आभार मानले. यावेळी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर उपस्थित होत्या.